पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

***दिनांक- १४/११/२०१९***

## गडचिरोली पोलीस दल राबविणार "बालकांचे हक्क व सुरक्षितता सप्ताह" जनजागृती अभियान

गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने पंडीत जवाहरलाल नेहरु यांचे जयंतीचे औचित्य साधुन बालक दिनानिमित्त दिनांक १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर दरम्यान संपुर्ण गडचिरोली जिल्ह्यात **" बाल हक्क व सुरक्षितता सप्ताह जनजागृती अभियान "** साजरा करण्यात येणार असून बाल अत्याचार प्रतिबंध, बालकांवरील लैंगिक अत्याचार याबाबत जनजागृती मोहिम राबविण्यात येणार आहे.

सदर सप्ताह महाराष्ट्र पोलीस, महिला व बाल कल्याण विभाग, शिक्षण विभाग, चाईल्ड लाईन व युनिसेफ यांचे संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार असुन शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बालकांचे हक्क व बालकांविरुध्द अत्याचार तसेच अत्याचारांना प्रतिबंध करणे, बालकांवरील लैंगिक शोषणाविरुध्दचे अत्याचार लपवुन न ठेवता पोलीसांना त्वरीत अवगत करणे, अत्याचाराच्या माहितीबाबत चाईल्ड हेल्प लाईन- १०९८, पोलीस हेल्प लाईन- १०३ किंवा स्थानिक पोलीस ठाणे येथे माहिती देणे, बालकांविरुध्द हिंसा करण्यास प्रतिबंध करणे याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. याकरीता गडचिरोली पोलीस दल, महिला व बाल कल्याण विभाग, शिक्षण विभाग, चाईल्ड लाईन व युनिसेफचे अधिकारी / कर्मचारी यांची टिम जिल्ह्यातील विविध शाळा व महाविद्यालयांना भेटी देणार आहेत.

सदर जनजागृती करीता **पॉवर पाईंट प्रेझेंटेशन** (पीपीटी) तयार करण्यात आली असुन शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ती दाखविण्यात येणार आहे. सदर जनजागृती प्रभावी होण्याकरीता शासकिय/अशासकिय संस्था उदा. लाईन्स क्लब, रोटरी क्लब, जायेंट्स क्लब किंवा अशासकिय संस्था (एनजीओ) यांना मोठ्या प्रमाणात सहभागी करुन घेण्यात येणार आहे. पोलीस काका व पोलीस दीदी हे त्यांचे हद्दीतील शैक्षणिक संस्थेमध्ये जावुन विद्यार्थ्यांना त्यांचे हक्काबाबत कायदेविषयक मार्गदर्शन करणार आहेत, 'विधी संघर्षीत बालक म्हणजे काय? याबाबत कायद्यातील तरतुदी, हक्क (JJ Act -2015) याअनुषंगाने विद्यार्थ्यांना माहिती देण्यात येणार आहे. तसेच शाळा व महाविद्यालयामध्ये मोहिमेदरम्यान घेतल्या जाणाऱ्या बाल हक्काविषयी शिबारामध्ये बालकांसंदर्भातील विविध कायदे, विधीसंघर्षीत बालक, बालकांचे हक्क, बालकामगार, बालविवाह, बालकांवरील लैंगिक अत्याचार, मादक द्रव्यांचा गैरवापर आणि त्यांचे दुष्परीणाम या बाबी अंतर्भुत असणार आहेत.

या सप्ताहाचे मोहिमेकरीता समन्वय अधिकारी म्हणुन पोलीस विभागातर्फे अप्पर पोलीस अधीक्षक दर्जाचे अधिकारी असणार आहेत. तसेच शिक्षण विभागातर्फे जिल्हा शिक्षण अधिकारी, महिला व बाल कल्याण विभागातर्फे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, चाईल्ड लाईनतर्फे जिल्हा चाईल्ड लाईन अधिकारी हे सदर विभागाचे जिल्हानिहाय समन्वय अधिकारी असतील.